दस्तावेज क्र. ३१

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

Maharashtra Water Resources Regulatory Authority (MWRRA)
9th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel. 2215 2019 Fax : 2215 3765 E_mail : mwrra@mwrra.org

क्रमांक : मजनिप्रा/२०१६/विधी विषयक/प्र.क्र. २/२०१६/१४२

दि. १७/०३/२०१६

**प्रकरण क्रमांक २/२०१६**

**मजनिप्रा अधिनियम, २०१५ च्या कलम ११ व १२ अन्वये कुकडी संकुलातुन घोड धरणात पाणी सोडण्याविषयी आणि समन्वायी वितरण करण्यासाठी, घोड उपखोऱ्यासाठी आणि घोड करिता पाण्याचा हिस्सा निश्चित करण्याविषयी**

श्री. राजेन्द्र शिवाजीराव नागावडे, मु. पो. वांगदरी, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर,

श्री. श्रीनिवास बाबुराव घाडगे, मु. पो. इनामगाव, ता. शिरुर, जिल्हा पूणे

मार्फत ॲड. एस. आर. पलांदे, पूणे .................................................. याचिकाकर्ते

विरुद्ध

सचिव (ज. सं. व्य. व ला. क्षे. वि.), महाराष्ट्र राज्य, व ईतर ........................ प्रतिवादी

या सोबत दि. १७/०३/२०१६ चा मजनिप्रा आदेश जोडला आहे.

सहपत्रः– वरीलप्रमाणे

स्वाक्षरीत

(डॉ. सुरेश कुळकर्णी)

सचिव

प्रति: माहितीकरिता व आवश्यक कार्यवाहीसाठी

१. सचिव (ज. सं. व्य. व ला. क्षे. वि.), ज. सं. विभाग, मॅडम कामा मार्ग, हुमात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई, ४०००३२

२. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे—४११०११

३. मुख्य अभियंता, (वि. प्र.) जलसंपत्ती विभाग, सिंचन भवन, बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे—४११०११

४. अधिक्षक अभियंता व प्रशासक, ला.क्षे.वि.प्रा., सिंचन भवन, बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे—४११०११

५. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, विधान भवन, नवी इमारत, बंड गार्डन, पूणे—४११०११

६. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कॉलेज एरीया, अहमदनगर, ४१४००१

प्रत माहिती करिता

१. श्री. राजेन्द्र शिवाजीराव नागावडे, मु.पो. वांगदरी, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर व श्री. श्रीनिवास बाबुराव घाडगे, मु. पो. इनामगाव, ता. शिरुर, जि. पुणे; मार्फत ॲड. एस. आर पलांदे, लायर्स चेंबर, नं. ए—१, जि. कचेरी कॅम्पस, शिवाजीनगर, पूणे, ४११००५.

२. श्री. दिलीप दत्तात्रय वळसे पाटील, विधानसभा सदस्य, आंबेगाव, १४, रिव्हर व्हयु अपार्टमेंट—२, पूणे—नगर रोड, येरवडा, पूणे, ४११०६४.

३. श्री. शरद दादा सोनावणे, विधानसभा सदस्य, जुन्नर, रायगड, चालकवाडी (पिंपळवंदी), ता. जुन्नर, जि. पूणे, ४१२४१३.

४. श्री. विजय भास्करराव औती, विधानसभा सदस्य, पारनेर, मु. पो. पारनेर, जि. अहमदनगर, ४१४३०२.

५. श्री. बबनराव पाचपुते, माजीमंत्री, माऊली निवास, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर, ४१३७०१

६. श्री. देवदत्त जयंतराव निकम, अध्यक्ष, भिमाशंकर सहकारी साखर कारखाना, मु. पारगाव, ता. आंबेगाव, जि. पूणे, ४१०५०४ मार्फत ॲड. सम्राट शिंदे व ॲड. तेजस देशमुख

७. श्री. नारायण गोविंदराव पाटील, करमाळा, जेऊर, ता. करमाळा, जि. सोलापूर, ४१३२०२

८. श्री. राहुल जगताप, वि. स. सदस्य, मु.पो. पिंपळगाव पिसा, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर, ४१३७०३

९. ॲड. यु. बी. निघोट, मार्फत श्री. रावसाहेबदादा घोडगंगा सहकारी साखर कारखाना, रावसाहेबनगर, मु. पो. नव्हारे, ता. शिरुर, जि. पूणे, ४१२२१०

१०.श्रीमती आशाताई बुचके, विरोधी नेता, पूणे जिल्हा परिषद, यशवंतराव चव्हाण भवन, नवीन प्रशासकीय भवन, वेल्सली रोड, कॅम्प, पूणे. ४११००१

११.डॉ. डी. एम. मोरे, ७/१, प्रितमनगर, कर्वे रोड, कोथरुड, पूणे, ४११०२९

दस्तावेज क्र. ३१

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

Maharashtra Water Resources Regulatory Authority (MWRRA)
9th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel. 2215 2019 Fax : 2215 3765 E_mail : mwrra@mwrra.org

क्रमांक : मजनिप्रा/२०१६/विधी विषयक/प्र. क्र. २, २०१६/१४२

दि. १७/०३/२०१६

**प्रकरण क्रमांक २/२०१६**

**मजनिप्रा अधिनियम, २०१५ च्या कलम ११ व १२ अन्वये कुकडी संकुलातुन घोड धरणात पाणी सोडण्याविषयी आणि समन्वायी वितरण करण्यासाठी, घोड उपखोऱ्यासाठी आणि घोड करिता पाण्याचा हिस्सा निश्चित करण्याविषयी**

श्री. राजेन्द्र शिवाजीराव नागावडे, मु. पो. वांगदरी, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर,

श्री. श्रीनिवास बाबुराव घाडगे, मु. पो. इनामगाव, ता. शिरुर, जिल्हा पूणे

मार्फत ॲड. एस. आर. पलांदे, पूणे ................................................... याचिकाकर्ते

**विरुद्ध**

१. सचिव (ज. सं. व्य. व ला. क्षे. वि.), ज. सं. विभाग, मॅडम कामा मार्ग, हुमात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई, ४०००३२

२. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे—४११०११

३. मुख्य अभियंता, (वि. प्र.) जलसंपत्ती विभाग, सिंचन भवन, बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे—४११०११

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, विधान भवन, नवी इमारत, बंड गार्डन,

पूणे–४११०११

५. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कॉलेज एरीया, अहमदनगर, ४१४००१.........
..................................................................................... प्रतिवादी

**आदेश**

**कोरम: श्री रवी बी. बुधराजा, अध्यक्ष**

**श्रीमती चित्‌कला झुत्शी, सदस्य (इकानॉमी)**

**दि. १७/०३/२०१६**

श्री. राजेन्द्र शिवाजीराव नागावडे, मु. पो. वांगदरी, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर, श्री. श्रीनिवास बाबुराव घाडगे, मु. पो. इनामगाव, ता. शिरुर, जिल्हा पूणे मार्फत ॲड. एस. आर. पलांदे, पूणे यांनी प्राधिकरणाकडे दि. ०४/९/२०१५ ला अर्ज दाखल केला. हे अर्जदार अहमदनगर व पूणे जिल्हातील शेतकरी आहेत. या अर्जात प्रतिवादी पुढीलप्रमाणे आहेत. १) सचिव, (ज.सं.व्य. व ला.क्षे.वि.), ज. सं. विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई २) जिल्हाधिकारी, पूणे ३) जिल्हाधिकारी, अहमदनगर आणि ४) मुख्य अभियंता, म. कृ. खो. वि. महामंडळ, पूणे. त्यांनी या अर्जात केलेली प्रार्थना पुढे दिल्याप्रमाणे आहे.

१) घोड प्रकल्पातंर्गत लाभ क्षेत्रातील भागास शेतीसाठी, पिण्याचे पाण्यासाठी कोटा ठरवून देण्यात यावा व सदरच्या कोटयानुसार पाणी वाटपाचा व पाण्याचे आवर्तनाचा कार्यक्रम ठरवून मिळावा.

२) घोड धरणाचे पाणलोट क्षेत्रातील डिंभे, वडज, माणिकडोह, येडगाव, पिंपळगावजोगे या धरणातून तसेच खुबी बंधारा व सोबतचे परिशिष्टातील कोल्हापूर बंधाऱ्यातून घोड धरणामध्ये महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन कायदा २००५ कलम १२(६) (क) नुसार समान न्यायपध्दती व कोटयानुसार पाणी सोडण्यात यावे. सदरचे डिंभे व इतर धरणातील पाणीसाठा घोड धरणात सोडून डिंभे धरणाप्रमाणे घोड धरणातील जलसाठा होईल इतके प्रमाणात पाणी सोडावे.

३) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन कायदा २००५ कलम ११ व १२ मधील तरतूदीनुसार घोड धरणाचे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना शेतीसाठी त्याचप्रमाणे पिण्याचे पाण्यासाठी वरील धरणातून घोड धरणात पाणी सोडण्याचा हुकूम व्हावा. घोड लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना टंचाई परिस्थितीत

कलम १२ (६) (ब) नुसार एक एकर शेतीसाठी पाणी पुरवठा करण्याचा नियोजनबध्द व कालबध्द आवर्तनाचा कार्यक्रम तयार करण्यात यावा.

**४) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन कायदा २००५ कलम १२ (६) नुसार घोड धरणाचा पाण्याचा कोटा निश्चित करण्यात यावा. निश्चित केलेला कोटा तातडीने घोड धरणात सोडून दुष्काळी परिस्थितीचे निवारणासाठी तातडीने नियोजन करण्यात यावे.**

**५) उन्हाळी हंगामामध्ये पाणीसाठयाचे स्थलांतराने मोठया प्रमाणावर होणारे पाण्याचे नुकसान व अपव्यय टाळण्यासाठी त्वरीत कोटयानुसारचा जलसाठा घोड धरणात स्थानांतरीत करण्यात यावा व दुष्काळी सदृश्य परिस्थितीत तो संरक्षित करण्याबाबत योग्य ती उपाय योजना करण्यात यावी.**

**६) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन कायदा २००५ मधील तरतूदींचे अनुषंगाने डिंभे व इतर धरण प्रकल्पातील पाणी वाटपाबाबत न्याय व हक्कानुसार पाणी वाटपाचा, पाण्याच्या आवर्तनाचा कालबध्द कार्यक्रम तयार होईपर्यत सदर जलसाठयाचा वापर रोखण्यात यावा. वरील विनंतीचे अनुषंगाने होणारे आदेशांचा तातडीने अंमल घेणेचे जाबदेणार यांना आदेश व्हावेत.**

**७) इतर योग्य व न्यायाचे हुकुम व्हावेत.**

२) वर दिलेल्या अर्जावर कार्यवाही करुन त्यावर म्हणजे प्र. क्र. ७/२०१५ वर २७/१०/२०१५ ला आदेश दिला ज्यामधे निष्कर्ष आणि निर्देश समाविष्ट होते. त्यानंतर कार्यकारी संचालक, म. कृ. खो. वि. महामंडळ, पूणे यांनी दि. २७/१०/२०१५ च्या आदेशाचे पुनर्विलोकन व्हावे म्हणून अर्ज केला. हा पुनर्विलोकनासाठी केलेला अर्ज दि. २५/११/२०१५ च्या प्राधिकरणाच्या आदेशाने खारीज केला. दिवाणी रिट याचिका क्र. ११६६४/२०१५ दि. ०५/११/२०१५ ला श्री. देवदत्त निकम विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या मधे मा. उच्च न्यायालय, मुंबई ने दि. ०२/१२/२०१५ च्या निर्देशाने आम्हाला आदेश दिला कि, म. कृ. खो. वि. महामंडळ, पूणे यांनी दाखल केलेला पूर्वोक्त अर्ज, ज्यामधे त्यांनी प्राधिकरणाचा आदेश दि. २७/१०/२०१५ चे पुनर्विलोकन करावे त्याचप्रमाणे श्री. देवदत्त निकम यांनी दि. ५/११/२०१५ ला मा. उच्च न्यायालय, मुंबई मधे केलेला अर्ज ज्यामधे त्यांनी प्राधिकरणाचा आदेश दि. २७/१०/२०१५ चे पुनर्विलोकन व्हावे म्हणून विनंती केली आहे, तो अर्ज निकालात काढावा. मा. उच्च न्यायालयाने त्यांच्या दि.

०२/१२/२०१५ च्या आदेशात बदल करुन त्यांच्या दि. ०४/१२/२०१५ च्या आदेशात स्पष्ट केले की, इतर गोष्टींबरोबर, अर्जदाराला त्यांच्या रिट याचिका क्र. ११६६४/२०१५ प्रमाणे, प्राधिकरणाचे एक सदस्य त्यांनी दि. २७/१०/२०१५ चे मुळ आदेश काढले होते, त्यांनी धनविषयक आर्थिक पुर्वग्रहाला थारा दिला होता, त्यामुळे त्यांनी प्र. क्र. ५ आणि ६/२०१५ वर निर्णय घायला नको होता, हा अर्जदाराचा वाद देखील प्राधिकरणाने विचारात घ्यावा. त्याप्रमाणे, म. कृ. खो. वि महांमंडळ, पूणे आणि श्री. देवदत्त निकम यांच्या अनुक्रमे दि. ७/१२/२०१५ आणि ९/१२/२०१५ च्या अर्जांवर सुनावणी घेऊन ते आमच्या दि. ५ जाने. २०१६ च्या आदेशाने, त्यातील निष्कर्ष व निर्देशांसह, निकालात काढले. त्यानंतर आम्ही ८ जाने २०१६ च्या आदेशाने दि. ५ जाने. २०१६ च्या आदेशाचे शुध्दीपत्रक निर्गमित केले. मा. उच्च न्यायालय, मुंबई रिट याचिका क्र. ८४६/२०१६ मधे अर्जदार देवदत्त निकम आणि राज्य शासन व इतर, गोष्टींबरोबर, निर्देश दिले की, ''१० हा आदेश, असा असला तरी, दुसऱ्या प्रतिवाद्याला, दि. ४ सप्टे. २०१५ च्या अर्जावर दिलेला आक्षेपित आदेश, त्याचप्रमाणे २७/१०/२०१५ चा आदेश मागे घेण्याची आणि त्याचप्रमाणे या अर्जावर नवीन आदेश काढण्याची (कायद्याप्रमाणे) मुभा आहे''. मा. उच्च न्यायालय, मुंबई दि. ०९/०२/२०१६ च्या आदेशात असलेल्या नोंदीप्रमाणे, आमच्या वकिलामार्फत, आम्ही आश्वासन दिले आहे की, आमचे दि. २७/१०/२०१५, ०५/०१/२०१६ व ०८/०१/२०१६ चे आदेश परत घेऊन, संबंधित पक्षांची सुनावणी घेऊन आदेश काढु.

३. वर दिलेल्या पार्श्वभूमिनुसार, आमच्या दि. १०/०२/२०१६ च्या सूचने प्रमाणे, आम्ही म. कृ. खो. वि. महामंडळ, पूणे, श्री राजेन्द्र नागावडे आणि श्री. श्रीनिवास घाडगे, श्री. देवदत्त निकम व इतर बऱ्याच संबंधित व्यक्तींना प्रकरणात नवीन सुनावणी करिता बोलावले आहे. उपरोक्त सूचनेची संबंधित माहिती सारांशाने अशी आहे.

> सदर प्रकरणी मा. न्यायालयामध्ये दि. ०९.०२.२०१६ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान प्राधिकरणाने दि. २७.१०.२०१५ आणि ०५.०१.२०१६ चे आदेश मागे घेत असल्याचे मा. न्यायालयास अवगत केले असून सदर प्रकरणावर नव्याने सुनावणी दि. १६ फेब्रुवारी, २०१६ रोजी दुपारी ३.०० वा. घेण्याचे कळविले आहे. त्याप्रमाणे

**बुधवार, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ रोजी दुपारी ३.०० वा. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई येथील कार्यालयात जागतिक व्यापार केन्द्र, सेंटर–१, ९ वा मजला, कफ परेड, कुलाबा, मुंबई–४००० ००५** येथे आपल्या दि. ०४.०९.२०१५ च्या अर्जावर सुनवाणी आयोजित केली आहे. सदर सुनावणीसाठी आपण उपस्थित राहावे.

२.० दि. १७/०२/२०१६ ला सुनावणी घेतली. त्यावेळी श्रीमती आशाताई बुचके, विरोधी नेता, जि. प. पूणे यांनी हस्तक्षेप करण्यासाठी त्यांचा अर्ज दाखल केला आणि तो अर्ज हस्तक्षेपिका म्हणून प्राधिकरणाने मान्य केला.

अ) याचिकाकर्त्यांचे वकिल श्री एस. आर. पलांदे तसेच खालील हस्तक्षेपक आणि प्रतिवादी बाजुकडचे अधिकारी सुनावणीला हजर होते:–

(i) श्री. देवदत्त निकम, मार्फत ॲड. सम्राट शिंदे

(ii) श्री. आर. बी. घोटे, कार्यकारी संचालक, म. कृ. खो. वि. महामंडळ, पूणे

(iii) श्री. विक्रांत चव्हाण, उपजिल्हाधिकारी, पूणे

(iv) श्री. आर. डी. शिंदे, अधिक्षक अभियंता, सी.ए.डी.ए. पूणे

(v) श्री. आर. बी. गलीयाल, अवर सचिव, ज.सं.वि. मंत्रालय, मुंबई

(vi) श्री. एस. एन. कोळी, कार्यकारी अभियंता, कुकडी,
प्रकल्प विभाग, नं. २, अहमदनगर

(vii) श्री. जी. बी. नन्नोर, कार्यकारी अभियंता, कुकडी,
प्रकल्प विभाग, नं. १, नारायणगाव

**प्राधिकरणाचे संमंत्रक**

डॉ. डी. एन. मोरे, तांत्रिक विशेषज्ञ, कोथरुड, पूणे हे हजर होते.

२.१ सुनावणीच्या वेळी आमचे आदेश दि. २७/१०/२०१५, ०५/०१/२०१६ आणि ०८/०१/२०१६ विषयी सर्व पक्षांना स्पष्ट केलेत की, आम्ही श्री. राजेन्द्र शिवाजीराव

नागावडे आणि श्री. श्रीनिवास बाबुराव घाडगे यांच्या दि. ०४/०९/२०१५ च्या अर्जावर नव्याने सुनवाणी घेत आहे.

**२.२ ॲड. श्री. एस. आर. पलांदे, यांनी, याचिकाकर्त्या मार्फत, सांगितले की,**

(i) ६६ केटी बंधाऱ्याऐवजी, खरं म्हणजे एकुण ७४ केटी बंधारे, कुकडी संकुल आणि घोड जलाशय दरम्यानच्या नदीवर आहेत. या सर्वांच्या पाण्याचा हिशेब गरजेचा आहे.

(ii) केटी बंधाऱ्यातील पाण्याचा उपयोग खरीप हंगामात त्यांच्या पाणी नियोजनात, करण्याकरीता तरतूद नाही.

(iii) कुकडी प्रकल्प ८ माही असुन, घोड ला मात्र पुर्ण काळापर्यंत पिकांचे नियोजन करता येते. त्यामुळे उष्ण हवामानातील आवर्तन कुकडी प्रकल्पाला लागु नाही.

(iv) जलाशयासाठी जेव्हा वापरण्यायोग्य पाण्याचे वापराचे % किंवा दुसरी एखादे परामितिक वापरतात, तेव्हा त्याकरिता जलाशयाचा स्वतंत्रपणे हिशेब करतात; तो संपूर्ण कुकडी संकुलासाठी करावयाचा नसतो.

(v) बंधाऱ्याने अडवणूक झालेल्या पाण्याच्या प्रवाहामुळे आणि कुकडी संकुलात केलेल्या साठवणीमुळे, घोड जलाशयात वर्ष २०१५ मध्ये पाण्याची उपलब्धता बरीच कमी झाली होती.

**२.३ ॲड. सम्राट शिंदे, हस्तक्षेपक श्री. देवदत्त निकम मार्फत,**

(i) उजनी आणि जायकवाडी साठी अवर्षणकाळात समन्यायी पाण्याच्या वितरणाचे अनुक्रमे, दि. २६/१०/२०१५ आणि दि. १९/०९/२०१४ आदेश हे प्राधिकरणाने मजनिप्रा अधिनियम २००५ च्या कलम ११ (सी) नुसार काढले होते. त्याचप्रमाणे कुकडी–घोडसाठी समन्यायी वितरण्यासाठी आदेश काढणे गरजेचे होते. कलम १२ (६) (अ) ते (सी) मधे असलेल्या तरतूदी तेव्हढया साधार नाहीत.

(ii) ज्याअर्थी, मजनिप्रा (वाटप व हक्कांवर देखरेख, वाद/तंटा व अपील्स व इतर बाबी) नियम २०१३ खारिज केले आहेत, त्याअर्थी अवर्षण, विपत्ती, इ. च्या व्याख्या लागू होऊ शकत नाही. नियम नसल्यामुळे त्यातील अधिनियमांच्या तरतुदी सुध्दा लागू होत नाही. अवर्षणाची जी व्याख्या महाराष्ट्र भूजल अधिनियम, १९९३, मधे दिली आहे, ती विचारात घेण्यायोग्य आहे.

(iii) घोड जलाशयासाठी म्हणजे प्रवाहाच्या खालच्या जलाशयासाठी वापरण्यायोग्य पाण्याच्या % साठी, जी उच्चतर सिमा ठेवली आहे, तिचा आधार स्पष्ट होत नाही.

(iv) कुकडी संकुलाचे जलाशय केव्हांही १००% भरलेले नाही परंतु घोड जलाशय १००% भरण्याची वारंवारिता बरीच जास्त आहे.

(v) प्रकल्पाचा अथवा उपखोऱ्याचा स्तर भरण्यासाठी जो हिस्सा निश्चित करण्यात येतो, त्यासाठी अधिनियम २००५ चे कलम १२ (६) केवळ मार्गदर्शक तत्व आहे. प्राधिकरण या कलमा अंतर्गत निर्देश देऊ शकत नाही.

(vi) घोड जलाशयाकरिता पाणी सोडतांना त्यावर किती लोकसंख्या अवलंबून आहे आणि सिंचनाखाली असलेले प्रत्यक्ष क्षेत्र याचा विचार होणे गरजेचे आहे.

(vii) वर्ष २०१४ मधे घोड जलाशयातील १.३ टीएमसी पाण्याच्या मृत साठवणीचा उपयोग केला होता.

त्यांनी आपली लिखित कैफियत सुध्दा सादर केली आहे जी पुनर्विलोकन अर्जाच्या विचारार्थ आहे आणि आम्ही ती विचारात घेतली आहे

**२.४ श्रीमती आशाताई बुचाके, विरोधी नेता, पूणे जि.प. हस्तक्षेपिका**

कुकडी संकुलाच्या मानिकडोह प्रकल्पाच्या सभोवताल असलेल्या आदिवासी क्षेत्रात पाण्याची तीव्र कमतरता वर्ष २०१५–१६ मधे जाणवली. पिण्याचे पाण्याचा माणसांकरिता तसचे जनावरांसाठी, उद्‌भवलेल्या प्रश्नाने तीव्र स्वरुप धारण केले

आहे. प्राधिकरणाला विनंती आहे की, त्यांनी या स्थळाला भेट द्यावी आणि तेथील परिस्थिती पाहुन, त्यानंतरच या प्रकरणात देण्यात येणारे आदेश काढावेत.

२.५ **श्री. आर. बी. घोटे, कार्यकारी संचालक, म.कृ.खो.वि.महामंडळ, पूणे**

(i) कुकडी संकुल, ६६ केटी बंधारे आणि घोड प्रकल्प हे सर्व स्वतंत्र प्रकल्प आहेत. त्यांच्या वेगवेगळया अस्तित्वामुळे, त्यांचे वेगळे असलेले प्रशासकीय मान्यता (एए), त्यांचे उत्पन्नाचे, ते ठरवण्यासाठी असणारे वेगळे घटक, निराळा पाणी वापर व भिन्नप्रकारचा पिकांचा आकृतिबंध; या सर्व बाबींमुळे त्यांना एकत्र जोडता येत नाही. केटी बंधारे ही जल संधारणाची रचना असुन त्यावर ५० टक्के अवलंबून राहू शकतो. त्यामुळे वापरण्यायोग्य पाण्याची गणना करताना, केटी बंधारे हे कुकडी संकुला सोबत विचारात घेऊ शकत नाही.

(ii) खाली दिलेल्या हिशेबावरुन हे स्पष्ट होते की, चांगला पाऊस झालेल्या वर्षात सुध्दा ज्यावेळी जलाशयात १५ ऑक्टोबर ला दोन्ही स्थितित म्हणजे पूर्ण खरीप वापर आणि खरिप वापर शुन्य, पूर्ण साठवण झालेली असते, त्यावेळी घोड जलाशयातील वापरण्यायोग्य पाण्याचे % हे ६०% पेक्षा कमी असते, जी सिमा त्यावर्षी समन्यायी वितरणासाठी आवश्यक समजली जाते.

| | |
|---|---|
| पूर्ण खरीप वापर + पूर्ण साठवण १५ ऑक्टोबर कुकडी संकुल | [८६४.३९६ + ७८.७२ x ०.४ + ३२८.८३]/१०८२.२७ = ११३ % |
| पूर्ण खरीप वापर + पूर्ण साठवण १५ ऑक्टोबर घोड प्रकल्प | [१५४.८० + (८.४९ + ९.०६) x ०.४) + ३.४१७]/२९४.४८ = ५६% |
| शुन्य खरीप वापर + पुर्ण साठवण १५ ऑक्टोबर कुकडी संकुल<br><br>शुन्य खरीप वापर + पुर्ण साठवण १५ ऑक्टोबर घोड प्रकल्प | = ८६४.३९६/१०८२.२७ = ८०%<br><br>= १५४.८०/२४९.४८ = ५३% |

जेव्हा पुरवणी अट पूर्ण होते, म्हणजे वापरण्यायोग्य पाण्याच्या कुकडी संकुल व घोड प्रकल्प टक्केवारीत तफावत १५% पेक्षा जास्त असेल. थोडक्यात चांगला पाऊस असलेल्या वर्षात देखील घोड प्रकल्प हा विपत्तीमधे असतो. त्यामुळे ६०% वापरण्यायोग्य पाण्याचा निकषाला काही अर्थ उरत नाही. म्हणून विशेषज्ञ समितीची नियुक्ती, त्याच्या अभ्यासासाठी, करुन यथायोग्य निकषाचा शोध पाण्याच्या समन्यायी वितरणासाठी घेणे आवश्यक आहे.

(iii) ऑगस्ट २०१५ मधे पेयजलाची टंचाई होती. त्यामुळे जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी मागणी केली की कुकडी लाभक्षेत्रात आवर्तने व्हावीत, जे व्यवहारात प्रत्यक्षात उतरले.

(iv) येडगाव हे कुकडी संकुलातील मुख्य धरण नाही. हा पीक–अप बंधारा आहे. डिंभे मधून येडगावला पाणी सोडतांना फार मोठी वहन हानी होते.

(v) कुकडी संकुलाचे जलाशय कधीच १०० टक्के भरले नाहीत. तर घोड जलाशय गेल्या ३२ वर्षात २३ वेळा पूर्ण क्षमतेने भरले आहे. त्यामूळे खात्रीने निष्कर्ष काढता येतो की, कुकडी साठवणीमुळे घोड जलाशयाची अडवणूक होत नाही.

(vi) घोड किंवा कुकडी संकुलाच्या जलाशयातुन सिंचनासाठी मृत साठवणीतुन पाणी घेण्याची बंदी आहे. असे दिसून आले आहे की खराब वर्षात कुकडी संकुलाच्या पिंपळगाव जोगे जलाशयाच्या मृत साठवणीतुन पाणी वापरणे आवश्यक ठरते ज्यामूळे पेयजलाची गरज पूर्ण होते. वर दिलेल्या या स्थितिमुळे खरीप हंगामातील टंचाईच्या काळात सिना व विसापूर तलावात पाणी सोडणे टाळता येईल.

(vii) दर हेक्टरी पाण्याचा वापर असा काढला आहे.

| प्रकल्प | लाभक्षेत्र (हेक्टर) | सकल वार्षिक मीमी³ मधे | दर हेक्टरी वापर (मी³) / हेक्टर |
|---|---|---|---|
| कुकडी संकुल | १,४६,००० | १०८२.२७ | ७,४१० |
| घोड | २०,५०० | २९४.४८ | १४,३०० |

कुकडी संकुलाच्या तुलनेत घोड प्रकल्पाचा पाण्याचा दर हेक्टरी वापर जवळपास दुप्पट आहे. कुकडीमधुन घोडमधे पाणी वळवल्याने कुकडी संकुलाची पाण्याची उपलब्धता आणखी कमी होईल.

(viii) कुकडी क्षेत्राची एकुण पेयजलाची गरज दि. ०१/१०/२०१५ ते १५/०७/२०१६ दरम्यान ७०.७६ मीमी³ आहे. यापैकी ५०% गरज कुकडी लाभ क्षेत्राच्या रबी आवर्तनाच्या वेळेस पुर्ण झाली. बाकीच्या ५०% पेयजलाची गरज पूर्ण करण्यासाठी एक आवर्तन उष्ण हवामानात प्रस्तावित केले आहे. कुकडी संकुलाच्या जलाशयात दि. १५/०२/२०१६ ला असलेली उपलब्ध साठवण १३९.४६ मीमी³ होती. बाष्पीभवन, पाणी गळती आणि जलाशय उपस्यांचा वापर इत्यादीमुळे दि. १५/०७/२०१६ पर्यंत होणारी हानी ५२.६० मीमी³ अनुमानित आहे. पेयजलासाठी नियोजित आवर्तनाला १२७.१३ मीमी³ पाण्याची गरज आहे, ज्यामुळे कुकडी संकुलाच्या मृत साठवणीत असलेल्या पाण्याचा वापर अपरिहार्य आहे. ६६ केटी बंधाऱ्याची सर्व मिळुन साठवण दि. १५/०२/२०१६ ला २२. ७० मीमी³ आहे. ज्यामुळे त्याला लागून असलेल्या क्षेत्राची पेयजलाची मागणी पूर्ण होईल. घोडच्या लाभक्षेत्रात, एक रबी आवर्तन होउन गेले आहे, आणि एका उष्ण हवामानाच्या आवर्तनाची पेयजलासाठी, जी उपलब्ध साठवण दि. १५/०२/१६ ला आहे, ती ध्यानात घेवून ती सुध्दा मृत साठवणीचा वापर न करता, व्यवस्था करता येईल.

(ix) कुकडी संकुलाच्या पाण्याच्या उपलब्धतेची मात्रा उत्प्लव शिर्षाच्या वर दि. १५/०२/२०१६ ला ५.७६ मीमी³ होती. जर एवढे पाणी कधी घोड जलाशयासाठी सोडण्याचे ठरले, तर त्याचा क्वचित्च काही उपयोग होईल. यामुळे कुकडी संकुलातुन घोड मध्ये पाणी सोडणे वांछनीय नाही.

(x) दि. १५/०२/२०१६ ची चल साठवणीची स्थिती खाली दिल्याप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| कुकडी संकुल | ४३०.२१ मीमी³ | (४९.७७%) |
| घोड प्रकल्प | ८३.३१ मीमी³ | (५३.८२%) |

पाणी साठवणीची टक्केवारी घोडपेक्षा कुकडी संकुलात कमी आहे, त्यामुळे कुकडीमधुन घोडमधे पाणी वळवल्यास, पूणे, अहमदनगर व सोलापूर जिल्हयातील दुष्काळाच्या तीव्रतेमधे आणखी भर पडेल.

**२.६ निवासी जिल्हाधिकारी, अहमदनगर व पूणे**

दोन्ही ठिकाणच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की त्याची पेयजलाची गरज ते कार्यकारी संचालक, म. कृ. खो. वि. महामंडळ, पूणे यांना कळवतील.


**२.७ श्री. देवदत्त निकम — हस्तक्षेपक**

कुकडी प्रकल्पाचा प्रकल्प पीडीत लोकांचे पुनर्वसन अजुन पूर्ण झालेले नाही. डिंभे व वडज धरणांच्या कालव्याचे बांधकाम अजुनही सुरु आहे. कांही स्थानिक पेयजल योजना, ज्या केटी बंधाऱ्याचे बांधकाम, कुकडी संकुल व घोड दरम्यान झाल्यामुळे, कार्यरत आहेत. घोड जलाशयात किती पाणी पोहचेल ही गंभीर विचाराचीच बाब आहे.

३.० घोड उपखोऱ्याशी संबंधीत प्रश्नांना विचार करण्याआधी या प्रकल्पाचा विहंगमावलोकन करणे उपयोगी ठरेल ज्यामुळे उपखोऱ्याच्या स्थितिचे योग्य आकलन होऊ शकेल. ही माहिती अधिक्षक अभियंता व प्रशासक, ला.क्षे.वि.प्रा. यांनी पुरवली आहे.

महाराष्ट्र राज्य भौगोलिक दृष्टया ५ नदी खोऱ्यात म्हणजे गोदावरी, कृष्णा, तापी, नर्मदा व कोकणातील पश्चिम वाहिनी नद्या. नदी खोरे हे नैसर्गिक जल—भूवैशानिक एकक असुन ते एका प्रादेशिक सिमेत मर्यादित असुन पाण्यासंबंधी होणाऱ्या सर्व कृती परस्परावलंबी असतात. उपखोरे राज्यातील संबंधीत नदी खोऱ्याचे एक जलभूवैशानिक उप—एकक आहे.


खडकपुर्णा व पुर्णा—येलदरी व सिध्देश्वर प्रकल्पाचे स्थळ दाखविणारा नकाशा खाली दिला आहे.




भिमा नदी, जी कृष्णा खोऱ्याचा भाग आहे, तिची घोड नदी ही प्रमुख उपनदी आहे. घोड नदी ही पश्चिम सहयाद्रि घाटातुन गावडेवाडी, ता. आंबेगाव, जि. पूणे येथे साधारणत: १००० मी. वर उंचीवरुन उगम पावते. घोड नदीच्या उपनद्या कुकडी, मीना आणि आर (पुष्पावती) आहेत, ज्या सहयाद्री पश्चिम घाटामधून उगम पावतात. या सर्व नद्यांचे उगमस्थान चांगल्या पावसाच्या क्षेत्रात आहे. घोड नदीची, तिच्या धरणापर्यंतची लांबी १७० कि.मी. आहे. तिचा आणि भिमानदीचा संगम पूणे जिल्हयातील दौंड जवळ आहे. या उपखोऱ्याचे क्षेत्र ३६२६ वर्ग किमी. चे असुन त्याचा विस्तार पूणे व अहमदनगर जिल्हयात पसरला आहे. अहमदनगर जिल्हयातील दुष्काळ ग्रस्त क्षेत्रात लाभ मिळावा म्हणून घोड प्रकल्पाची योजना केली आहे. हा प्रकल्प बहुउद्देशीय आहे, म्हणजे त्याच्या पाण्याचा वापर पेयजल तथा सिंचनासाठी होत आहे. सध्या १.२८ लक्ष लोकसंख्या घोड जलाशयावर पेयजलासाठी अवलंबून आहे.

महाराष्ट्र शासनाने जी राज्य जलनीती २००३ मधे तयार केली त्याप्रमाणे राज्याच्या जलसंपत्तीचे नियोजन, विकास आणि व्यवस्थापन केले जाईल, ज्यात खोरे आणि उपखोरे एकक असेल. नीतिमधे सांगितल्याप्रमाणे जेथे पाण्याच्या उपलब्धतेचे संकट निर्माण झाले आहे तेथे टंचाईच्या काळात उपलब्ध पाण्याचे समन्यायी वाटप विविध वापराच्या क्षेत्रात तसेच वरच्या आणि खालच्या प्रवाहांच्या जलाशयात केले जाईल.

३.२ घोड उपखोऱ्याचा जो भिमा नदीच्या उपखोऱ्याचा भाग आहे त्याचा नकाशा खाली दिला आहे.



घोड उपखोऱ्यात घोड नदीवर घोड प्रकल्प आणि कुकडी प्रकल्प संकुल आहेत. त्यासोबत घोड जलाशयाच्या वरच्या प्रवाहावर ६६ केटी बंधारे आहेत; आणि जलाशयाच्या वर कुकडी धरण आहेत.

अ) घोड प्रकल्पाला आरंभीच्या काळात प्रशासकीय मान्यता दि. १२/०७/१९५४ ला मिळाली, प्रकल्पाचे बांधकाम १९५४ मधे सुरु होऊन १९६५ मधे संपले. प्रकल्पाचे शिरुर तालुका पूणे, श्रीगोंदा व कर्जत तालुक्याच्या दुष्काळी भागात २०५०० हेक्टर वर सिंचनाची तदतूद केली आहे; त्यापैकी १००० हेक्टरला बारमाही सिंचनाची सोय करण्यात १७/०५/१९८५ मधे शासनाची मंजुरी मिळाली आहे. वार्षिक पाणी वापर हजार दशलक्ष क्यु. फुट (टीएमसी) मधे असा आहे.

**तक्ता क्र. १**

| **वापर** | **वार्षिक वापर (टीएमसी)** |
|---|---|
| सिंचन | खरीप—३.७०, रबी ४.०८, उष्ण हवामान २.२० एकूण ९.७८ |
| पेयजल | ०.३० |
| औद्योगिक | ०.३२ |
| एकुण | १०.४० |

ब) कुकडी प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता दि. ०८/११/१९६६ ला मिळाली आहे. हा एकत्रित प्रकल्प असुन त्यात एकुण ५ धरणे आहेत. घोड नदीवर डिंभे, मिना नदीवर वडज, कुकडी नदीवर मानिकडोह व येडगाव व आर (पुष्पावती) नदीवर पिंपळगाव गोजे, प्रकल्पामुळे पूणे, अहमदनगर व सोलापूर जिल्हयांमधे दुष्काळी भागात १.४६ लक्ष हेक्टरवर सिंचनासाठी तरतूद केली आहे; ज्यामुळे ८ माही पिकांच्या आकृतिबंधात फक्त खरिप व रबी पिकांची सोय झाली आहे. कुकडी संकुलात पाण्याचा वार्षिक वापर, खाली दिला आहे.

**तक्ता क्र. २**

| वापर | वार्षिक वापर (टीएमसी) |
|---|---|
| सिंचन | खरीप–११.६१, रबी १८.३६, उष्ण हवामान ०.८८ एकूण ३०.८८५ |
| पेयजल व औद्योगिक | २.७८० |
| येडगाव ला पाणी सोडतांना होणारी हानी | १.११० |
| बाष्पीभवन हानी | ३.४८५ |
| एकुण | ३८.२२० |

क) ६६ केटी बंधारे: याच्या पाणी वापर नियोजनामुळे घोड जलाशयाच्या वरच्या प्रवाहात ९०.२० मीमी$^3$ (३.१८ टीएमसी) ची तरतूद फक्त रबी पिकांसाठी केली आहे, त्यामुळे खरीप सिंचनाची तरतूद नाही.

४.० **विश्लेषण**: घोड उपखोऱ्यातील पाण्याचे समन्यायी वितरण व्हावे म्हणून याचिका कर्त्यांनी मजविप्रा अधिनियम २००५ च्या कलम ११२ (६) (सी) नुसार मजविप्रा कडे अर्ज केला आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे, घोड प्रकल्पाच्या वरच्या भागातील असलेले ६६ केटी बंधाऱ्यांच्या प्रवाहाला अडथळा झाल्यामुळे घोड लाभ क्षेत्रातील लाभार्थ्यांवर त्याचा विपरित परिणाम झाला आहे. त्यामुळे कुकडी संकुलाच्या धरणांपासून जे घोड प्रकल्पाच्या वरच्या बाजूला आहेत, घोड जलाशयात सोडण्यात यावे. घोड जलाशयात सप्टेंबर २०१५ च्या पहिल्या आठवडयात चल साठवण नव्हती.

४.१ परिच्छेद ३.२ (अ) मधे दिसून येईल की घोड प्रकल्पाच्या पाणी वापर नियोजनानुसार ३.७० टीएमसी चा खरीप वापर, ४.०८ टीएमसी चा रबी वापर आणि उष्ण हवामानात २.० टीएमसी ची तरतूद आहे. याचिका कर्त्यांनी समन्यायी पाणी वितरणाची अधिनियम २००५ प्रमाणे विनंती केली आहे. एम एम आय एस एफ अधिनियम २००५ च्या अंतर्गत घोड प्रकल्पाचे लाभ क्षेत्र आखुन दिले आहे आणि पाणी वापर संस्था बनवल्या

आहेत. या संस्था पाण्याचा हक्कदार असुन त्यासाठी त्यांचा हिस्सा ठरवला आहे. म्हणून कलम १२ (६) (सी) च्या तरतूदी घोड प्रकल्पाला लागू आहेत. या तरतूदी अमलांत आणण्यापूर्वी, या कलमामधे दिलेल्या आवश्यक गोष्टींची पुर्तता करणे गरजेचे आहे. कलम १२ (६) (सी) खाली दिल्याप्रमाणे आहे.

१२ (६) खोरे स्तरावर, उपखोरे स्तरावर किंवा प्रकल्प स्तरावर प्राधिकारी खाली दिलेल्या तत्वांनुसार, त्यांचा हिस्सा ठरवतील.

(ए) .........................

(ब).........................

(सी) खोऱ्यातील पाण्याची तूट समप्रमाणात विभागली जावी यासाठी खोऱ्यातील सर्व धरणातील पाणीसाठे दरवर्षी ऑक्टोबर अखेर अशा तऱ्हेने नियंत्रित केले जातील की, वर्षातील वापरासाठी उपलब्ध असलेल्या पाण्याची (खरीप वापरासहीत) टक्केवारी सर्व धरणासाठी जवळजवळ सारखी राहील;

या कलमामधे वापरण्यायोग्य पाण्याचे % म्हणजे १५ ऑक्टोबरला जलाशयात उपलब्ध असलेले, खरीप धरुन, पाणी आणि रचनेप्रमाणे असलेला नियोजित पाणी वापर जे शेवटच्या पाणी वापर नियोजनाच्या मंजुरी प्रमाणे आहे, त्यांच्यातील गुणोत्तर.

या कलमात जो संकटाचा उल्लेख, त्यात प्राधिकरणाने संकटाचा अर्थ समजुन घेण्याची गरज आहे. पाणी वापरच्या मुळ गरजा जसे पेयजल, अन्न पिकांची गरज, खरीप व रबी मधील आणि औद्योगिक वापरासाठी दिलेले वचन इ. बाबी उपखोऱ्यातील सर्व जलाशयांनी पाण्याचे दुर्भिक्ष वाटुन घेण्यासाठी लक्षात ठेवाव्या लागतील.

राज्य जल नीतीच्या परिच्छेद २.८ मधे दिलेल्या तरतुदी प्रमाणे पाणी दुर्भिक्षाचे व्यवस्थापन करतांना, प्रवाहाच्या वरच्या व खालच्या पाणी वापराच्या सर्व क्षेत्राच्या वापर कर्त्यांनी उपखोऱ्यातील सर्व जलाशयांनी पाण्याचे दुर्भिक्ष वाटुन घेतले पाहिजे.

व्यावहारिक विचाराच्या दृष्टीने, खालचा प्रवाहात असणारे वापरण्यायोग्य पाण्याचे दुर्भिक्ष लक्षात घेता, वापरण्यायोग्य पाण्याचा कपात बिंदू ठरवणे आवश्यक आहे, ज्या

बिंदुच्या खाली समन्यायी वितरणाला चालना देता येईल. पेयजल आणि औद्योगिक वापरासाठी योग्य कपात, राज्य जलनीती च्या परिच्छेद २.८ मधे दिल्याप्रमाणे लागू करता येते. पाणी उपलब्धतेची उपखोऱ्यातील कमतरता अशा रितीने वाटुन घेता येईल.

वापरण्यायोग्य पाण्याची टक्केवारी म्हणजे प्रस्तावित पाणी वापर (खरीप साठी आधी केलेले पाणी वाटप धरुन) आणि नियोजित वार्षिक पाणी वापर यांच्यातील गुणोत्तर.

घोड प्रकल्पातील नियोजित वार्षिक पाणी वापर असा आहे

**तक्ता —३ (टीएमसी)**

| | |
|---|---|
| पेयजल | ०.३० |
| औद्योगिक | ०.३२ |
| सिंचन | |
| अ) खरिप | ३.७० |
| ब) रबी (४ आवर्तने) | ४.०८ |
| क) उष्ण हवामान | २.०० |
| एकुण सिंचन | ९.७८ |
| सर्व एकुण | १०.४० |

पाण्याच्या दुर्भिक्षाची स्थिति करता कपात बिंदू घोड जलाशयासाठी अशारितीने ठरवता येईल

**तक्ता क्र. ४**

| | |
|---|---|
| १. रबी हंगामात प्रस्तावित केलेला वापर (आणि खरीप हंगामात झालेला वापर) याचा हिशेब करतांना पेयजल व औद्योगिक वापर याच्यात २०% कपात आणि रबी वापरात | (०.३ * ०.८) + (०.३२ * ०.८) + [३.७ + (४.०८ * ०.५०) + २*०] = ६.२३६ २ रबी आवर्तनाने वापरण्या योग्य पाण्याचे % हे, ६.२३६/१०.४ = ०.६० म्हणजेच ६० टक्के. |

| | |
|---|---|
| ५०% कपात आणि उष्ण हवामानात १००% कपात लक्षात घेतात | |

(ब) समन्यायी वितरणाची उच्चतर सिमा आता ६५% ऐवजी विहित केली नाही

(२) खालच्या प्रवाहाच्या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात, विपत्तीच्या दुर्भिक्ष काळात, वापरण्यायोग्य पाण्याचे % ची उच्चतर सिमा ठरविण्यासाठी आम्ही जास्तीत जास्त २ रबी आवर्तने विहित करतो. वर दिलेल्या हिशेबाप्रमाणे, वरच्या प्रवाहातील जलाशयाचे पाणी खालच्या जलाशयात साठवणी मधे सोडण्यासाठी, उच्चतर सिमा ६०% (दि. १५ ऑक्टोबर ला) येते.

पाण्याचे वहन होताना हानी होते याचा विचार करता, असे वाटते की, समन्यायी वितरणाला चालना मिळण्यासाठी, वरच्या व खालच्या भागात असणाऱ्या वापरण्यायोग्य पाण्याचे प्रमाणात १५% पेक्षा कमी फरक असु नये.

वरच्या प्रवाहातील कुकडी संकुल व ६६ केटी बंधारे तसेच घोड जलाशयातील साठवणीच्या स्थितिचे पुनर्विलोकन केल्यानंतर, वरच्या जलाशयाचे, वर दिलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे, नियमन करणे तर्कसंगत राहील; असे केले तर, वरच्या आणि खालच्या जलाशयात उपलब्ध असल्या पाण्याचे दरवर्षी ऑक्टोबर महिन्याचे शेवटी समन्यायी वितरण करता येईल. हे सर्व करित असतांना, सर्वात आधी, पुढच्या वर्षाच्या १५ जुलैपर्यंत भासणारी पेयजलाची उपखोऱ्यातील गरज पुर्ण होईल याची खातरजमा केली पाहिजे.

वरच्या भागातील जर एखादा जलाशय त्याची स्वत:ची पेयजलाची गरज भागवु शकला नाही, उदा. वर सांगितल्याप्रमाणे २ पिकाची आवर्तने (खरीप धरुन) आणि वचनबध्द औद्योगिक वापर पुर्ण होईपर्यंत, त्या जलाशयातुन पाणी सोडण्याचा विचार करता येणार नाही.

तथापि, वरच्या अथवा खालच्या प्रवाहातील जलाशयामधुन, मृत साठवणीचे पाणी सिंचन करता सोडणार नाही, याची खात्री करुन घ्यावी.

४.२ परिच्छेद ३.२ मधे सांगितल्याप्रमाणे, कुकडी प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता दि. ०८/११/१९६६ ला मिळाली आहे. हा एकत्रित प्रकल्प असुन त्यात एकुण ५ धरणे आहेत. त्यामुळे त्यातील जलाशयांचा वेगळा प्रकल्प म्हणून विचार करणे चुकीचे होईल.

४.३ अधिक्षक अभियंता, ला.क्षे.वि. प्राधिकरण यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, प्रशासनिक मंजुरी प्रमाणे ६६ के टी बंधाऱ्याचे पाणी नियोजनात, या बंधाऱ्यातुन खरीप वापरासाठी तरतुद नाही. त्यात फक्त एकच तरतुद आहे, ती म्हणजे रबी वापराची. त्यामुळे खरीप हंगाम संपत नाही तोपर्यंत सूचि इन्सर्शन (उपकरण) वापरुन के टी बंधाऱ्यात पाण्याची साठवण करता येत नाही. के टी बंधारा कुकडी संकुलाच्या खाली असलेल्या जलग्रहण क्षेत्रातुन येणाऱ्या मुक्त प्रवाहाने भरण्याचे नियोजन आहे, परंतु कुकडीतुन सोडलेल्या पाण्याने भरल्याचे नियोजन नाही आहे.

तक्ता क्र. ६ मधे दिसुन येईल की, खरीप हंगामात अंदाजे १७.३३८ मीमी[३] केटी बंधाऱ्याचे पाणी मान्सुन २०१५ मधे वापरले आहे. प्रकल्पाच्या नियोजनात हे करायची अपेक्षा नव्हती. नियोजनात केटी बंधाऱ्याचे पाणी खरीप हंगामात वापरायचा उल्लेख नाही. या तक्त्यात असे दिसुन आले की, घोड प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात खरिप वापराकरिता पाणी नव्हते. आणि जेंव्हा पहिला अर्ज दाखल केला त्यावेही चल साठवण नव्हती.

अधिक्षक अभियंता, ला.क्षे.वि.प्रा. यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे प्रशासकीय मान्यतेने मंजुर झालेले घोड प्रकल्पाचे पाण्याच्या नियोजनानुसार, त्यात खरीप, रबी व उन्हाळी पाण्याच्या वापरीकरिता तरतुद आहे. तसेच, घोड प्रकल्पाच्या स्थळावर, ७५% विश्वासु उत्पन्नावर उपलब्ध पाणी ५१.३० टीएमसी आहे. घोड प्रकल्पाचा वाटप केलेला हिस्सा १०.४० टीएमसी आहे. कुकडी संकुलाला ३८.९० टीएमसी पाणी वापराची परवानगी आहे; तर घोड उपखोऱ्यातील इतर प्रकल्पांना २ टीएमसीची परवानगी आहे.

६६ केटी बंधाऱ्यात पाण्याचा नियोजित वापर ३.१८ टीएमसी आहे. आणि चिल्लेवाडीचा वापर ०.८७ टीएमसी आहे. त्याशिवाय स्थानिक क्षेत्रात जलसंधारणाचे काही क्षेत्र असतील, त्यांचा वर दिलेल्या हिशेबात समावेश नाही. यावरुन असे दिसून येईल की घोडच्या

वरच्या भागात ६६ केटी बंधारे व चिल्लेवाडी प्रकल्प बांधून, घोडस्थळाची पाण्याची उपलब्धता कमी झाली आहे.

घोड प्रकल्प स्थळाची केवळ पाणी उपलब्धता ही ५१.३० – (३८.९०+३.१८+०.८७) = ८.३५ टीएमसी आहे. यातुन निष्कर्ष असा निघतो की घोड प्रकल्प स्थळाची पाणी उपलब्धता, केटी बंधारे बांधल्यामुळे बाधीत झाली आहे.

४.४ सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगी नंतर, अपवादात्मक स्थितीत, पेयजलासाठी,

बंद पाईप व्दारे मृत साठवणीतुन पाणी घेता येईल.

४.५ जो वाद आमच्या समोर विचारार्थ आला आहे, तो म्हणजे पाण्याच्या कुकडी प्रकल्पातील साठवणीचे % हे घोड प्रकल्पात असलेल्या पाण्याच्या साठवणीच्या % पेक्षा कमी आहे काय? आणि तसे असल्यास, कुकडी संकुलातुन घोड प्रकल्पाकडे पाणी वळवणे योग्य ठरेल काय? मजनिप्रा अधिनियम, २००५ च्या कलम १२ (६) (सी) नुसार % हे वापरण्यायोग्य पाण्यावर काढतात, ज्यात खरीप वापर समाविष्ट आहे. आणि म्हणून म. कृ. खो. वि. महामंडळाने काढलेला निष्कर्ष ग्राहय नाही.

४.६ कुकडीचे पाणी घोड मधे वळविल्यास, दुष्काळाची तीव्रता अवर्षण प्रवण अहमदनगर व सोलापूर जिल्हयाच्या भागात वाढेल. आमचे असे मत आहे की, वरच्या प्रवाहातून खालच्या प्रवाहात पाणी सोडणे हे समानतेच्या तत्वावर, जे अधिनियम २००५ च्या कलम १२ (६) (सी) मधे सांगितल्याप्रमाणे, आधारित आहे.

४.७ हा देखील वादाचा एक मुद्दा आहे की, घोड लाभक्षेत्रात पाणी वापर (१४,३००क्यु. मी/हेक्टर आहे, तर कुकडी लाभक्षेत्रात, हे परिणाम तुलनेने कमी आहे. (७४१० क्यु. मी/हेक्टर). तसेच उष्ण हवामानात होणाऱ्या पाणी वापराचा सुध्दा विचार पाण्याचे समन्यायी वितरण करतांना व्हायला पाहिजे. मजनिप्रा अधिनियम २००५ च्या कलम १२ (६) (सी) मधे, किती पाण्याचा वापर दर हेक्टरी व्हावा याचा निकष, पाण्याच्या समन्यायी वितरणासाठी दिलेला नाही.

४.८ मागच्या वर्षीचा (२०१४—१५) चा कुकडी संकुलाचा २.४ टीएमसी चा वापर या वर्षी झाला आहे, तो हिशेबात यायला हवा. हा मुद्दा आम्ही तपासला आहे. आमचे मतानुसार हिशेब पुढे नेणे हा चल साठवणीचा एक भाग आहे. आणि मजनिप्रा अधिनियम २००५ च्या कलम १२ (६) (सी), नुसार त्या पाण्याचा वापर त्या वर्षी झाला, असे समजावे.

४.९ ६६ केटी बंधारे जे घोड धरणाच्या वरच्या प्रवाहात आहेत, त्यांना कुकडी संकुलाचा एक भाग समजावा काय? हा मुद्दा देखील आम्ही तपासला. चल साठवण हा कुकडी संकुलाच्या वापरण्यायोग्य पाण्याचा एक भाग आहे, असे आमचे मत आहे.

४.१० जेंव्हा चांगल्या पावसाच्या वर्षात घोड प्रकल्प १५ ऑक्टोबरला १००% भरलेला असतो, तेंव्हा समन्यायी तत्वाने करावयाचे वितरणासाठी उच्चतर सिमेच्या निकष लावावा काय? यावर आमचे मत आहे की, कार्यकारी संचालक, म. कृ. खो. वि. महामंडळ, पूणे यांनी जो हिशेब केल्याचे सांगितले आहे, त्यात चुक आहे. घोड प्रकल्पाच्या पूर्ण खरीपाच्या वापरात, नियोजित खरीप सिंचनाचा वापर त्यांनी टीएमसी मधे घेतला आहे. तर इतर सर्व आकेडवारी मीमी³ मधे दिली आहे, तर जेंव्हा त्यामधे दुरुस्ती केली, तेंव्हा टक्केवारी ८८ आली आहे, जी खाली दिलेल्या तक्त्यात दिली आहे.

**तक्ता क्र. ५**

| | |
|---|---|
| पूर्ण खरीप वापर + पुर्णसाठवण दि. १५ ऑक्टोबरला, घोड प्रकल्पाचे | = [१५४.८० + (८.४९+९.०६) x ०.४ + ९६.७५]/२९४.४८ = ८८% |
| शुन्य खरीप वापर + पुर्णसाठवण १५ ऑक्टोबरला, घोड प्रकल्पामधे | = (१५४.८०/२९४.४८ = ५३% |

९६.७५ मीमी³ = ३.४१७ टीएमसी जी खरीप हंगामाकरीता घोड प्रकल्पाची गरज आहे.

याकरिता, म. कृ. खो. वि. महामंडळाचे म्हणणे चुकीचे ठरते.

५.० घोड उपखोऱ्यात समन्यायी वितरण राबवण्यासाठी दिलेले निर्देश.

खाली दिलेल्या तक्त्यात वापरण्यायोग्य पाण्याचे, दोन्ही प्रकल्पात म्हणजे कुकडी संकुल (ज्यात ६६ केटी बंधारे समाविष्ट आहेत) आणि खालच्या प्रवाहातील घोड प्रकल्पाची, टक्केवारी दिली आहे. आधिक्षक अभियंता, ला.क्षे.वि. प्राधिकरण पूणे कडुन १९/१०/२०१० ला प्राप्त साठवण स्थितीची दि. १५/१०/२०१५ ची माहिती, कुकडी संकुल, ६६ केटी बंधारे व घोड प्रकल्पाबद्दलची, खाली तक्त्यात दिली आहे.

## तक्ता क्र. ६

| साठवण | रचित चल साठचण | चल साठवण दि. १५/१०/१५ | खरीप वापर २०१५ | | पेयजलाची गरज जी साठवण व कालव्यावर दि. ०१/१०/१५ ते १५/०७/१५ दरम्यान अवलंबून आहे | | एकुण बाष्पीभवन हानी ०१/१०/१५ ते १५/०७/१५ | वहन हानी असली तर दि. ०१/१०/१५ ते १५/०७/१५ | पाणी वापर ४अ ४ब ५व ६ | शिल्लक साठवण २ ते ७ | एकुण रबीची गरज प्रकल्प नियोजन प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पेयजल | सिंचन | पेयजल | उद्योग | | | | | |
| १ | २अ | २ब | ३अ | ३ब | ४अ | ४ब | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| अ) कुकडी संकुल | ८६४.३९९ | ४३०.२०६ | ६०.९३० | ७२.८४० | ७०.७६१ | २.२३३ | ७८.२५० | १२८.४९४ | २७९.७३८ | १५०.४६८ | ५१९.५३० |
| ब) ६६ केटी बंधारे | ६९.९६६ | ४६.२८० | ०.०० | १७.३३८ | १.२९० | ०.१७२ | १०.४९५ | ०.०० | ११.९५७ | ३४.३२३ | ९०.२०० |
| एकुण अ +ब | ९३४.३६२ | ४७६.४८६ | ६०.९३० | ९०.१७८ | ७२.०५१ | २.४०५ | ८८.७४५ | १२८.४९४ | २९१.६९५ | १८४.७९१ | ६०९.७३० |
| घोड | १५४.८०० | ८३.३१० | ३.०४० | १.७५० | ६.६७३ | ३.४९६ | २३.२१० | ०.०० | ३४.३७९ | ४८.९३१ | ११५.४६० |

घोड प्रोजेक्टचे वापरणीत येणारे पाणी असे होते.

वापरण्यायोग्य पाणी

= चल साठवण दि. १५/१०/२०१५ + २०१५ मधील खरीप वापर

= ८३.३१ + (३.०४ + १.७५) = ८८.१० मीमी³

खरीप वापर धरुन वापरणीत येणाऱ्या पाण्याची उपलब्ध टक्केवारी, दि. १५/१०/२०१५ ला प्रवाहाच्या संकुलात तसेच खालच्या संकुलात अशी होती.

तक्ता क्र. ७

| साठवणी | वापरण्यायोग्य पाण्याची उपलब्ध टक्केवारी, खरीपसह, दि. १५/१०/२०१५ रोजी |
|---|---|
| वरचा प्रवाह: कुकडी संकुल व ६६ केटी बंधारे | (४७६.४८६+६०.९३+९०.१७८)/ (१०८२.२७ # + ९१.४२@) = ५३.४७ % |
| खालचा प्रवाह: घोड प्रकल्प | (८३.३१ + ३.०४ + १.७५)/ २९४.४८## = २९.९२% |

डीझाइन्ड (रचित) पाणी वापर हा प्रकल्प नियोजनाप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ८**

#कुकडी प्रकल्पाचा सकल वार्षिक पाणी वापर मीमी³

| | |
|---|---|
| सिंचन गरज | ८७३.७२ |
| साठवणीतील बाष्पीभवनामुळे झालेली हानी | ९८.६८ |
| येडगाव साठी पाणी सोडण्यासाठी होणारी वहन हानी | ३१.१५ |
| बिगर सिंचन वापर | ७८.७२ |
| एकुण | १०८२.२७ |

**तक्ता क्र. ९**

६६ केटी बंधाऱ्याचा सकल वार्षिक पाणी वापर (मीमी³)

| | |
|---|---|
| रबी वापर | ९०.२० |
| पेयजल वापर | १.२२ |
| एकुण | ९१.४२ |

**तक्ता क्र. १०**

##घोड प्रकल्पाचा सकल वार्षिक पाणी वापर (मीमी³)

| | |
|---|---|
| सिंचन | २३२.८५ |
| बाष्पीभवन | ४४.०८ |
| पेयजल | ८.४९ |
| औद्योगिक | ९.०६ |
| एकुण | २९४.४८ |

वापरण्यायोग्य उपलब्ध पाण्याची टक्केवारी घोड प्रकल्पात दि. १५/१०/१५ ला २९.९२% होती; म्हणजे ६०% पेक्षा कमी, ज्याप्रमाणे वर विहित केले आहे आणि वरच्या व खालच्या प्रवाहात असलेल्या पाण्यामधील तफावत ही १५% पेक्षा जास्त आहे. आणि म्हणून अधिनियम २००५ च्या कलम १२ (६) सी नुसार हे प्रकरण समन्यायोचित वितरणास ग्राहय ठरते.

या कलमात असलेल्या तरतुदीनुसार, ऑक्टोबर शेवटी, वापरण्यायोग्य पाण्याचे % हे जवळपास सारखे पाहीजे. त्यामुळे कुकडी संकुल आणि ६६ केटी बंधाऱ्यातुन ४५ मी मी³ (१.६ टीएमसी) पाणी घोड जलाशयात ८३.३१ + ०.७५x४५ = ११७.०६ मीमी³ (४.१३ टीएमसी) साठवण खुणेपर्यंत, २५% वहन हानी लक्षात घेऊन, जर आदेश ऑक्टोबर मधे निर्गमित केला होता तर, सोडणे गरजेचे आहे. यामुळे कुकडी संकुल व

६६ केटी बंधाऱ्यामधे वापरण्यायोग्य पाण्याचे % अंदाजे ५०% राहिले असते; तर घोड प्रकल्पात अंदाजे ४२% राहीले असते, तर कलम १२ (६) (सी) प्रमाणे जवळपास समन्योयोचित वितरण झाले असते.

या प्रकरणात या प्रधिकाऱ्याच्या दि. ०५/०१/२०१६ च्या आदेशानुसार घोड प्रकल्पाच्या वरच्या प्रवाहात २४ मीमी³ पाणी सोडण्याचे निर्देश दिले होते. तथापि, म.कृ . खो. वि. महामंडळ, पूणे यांना दि. २०/०१/२०१६ मीमी³ पाणी दि. २०/१/२०१६ पर्यंत सोडले होते. प्राधिकरणाने, आधी सांगितल्याप्रमाणे, दि. ०५/०१/२०१६ चा आदेश परत घेतला आहे.

५.१ याचिकाकर्त्याने प्राधिकरणाला विनंती केली की त्यांनी हिस्सा ठरवावा. या संबंधात अधिनियम २००५ च्या कलम ११ (अ) चा संदर्भ घ्यावा, जो खाली पुनरुधृत केला आहे.

(अ) नदी खोरे अभिकरणाने विहित करण्यात येतील अशा अटी व शर्तींवर, विविध प्रवर्गातील पाणी वापराच्या हक्कांचे वितरण आणि वापराच्या प्रत्येक प्रवर्गामधील पाणी वापराच्या हक्कांचे समन्यायी तत्वांवर वितरण निर्धारित करणे;

या कलमानुसार, प्राप्त हक्क असलेल्या बाबींचे (पाण्याचे) वितरण करण्याचा निकष, प्रत्येक वापराच्या प्रवर्गाच्या अधिन राहून प्राधिकरण ठरवते. पाणी सोडण्याचे काम पुर्ण झाल्यावर साठवणीत जी पाण्याची मात्रा उपलब्ध आहे, त्या आधारावर नदी खोरे अभिकरण हिस्सा म्हणजे पाण्याची मात्रा, प्रत्येक हक्कदारासाठी (लाभार्थी) त्याला मिळणाऱ्या हक्काप्रमाणे, ठरवते.

५.२ तथापि, आता जे कांही पाणी सोडावयाचे आहे त्याची मात्रा सध्याच्या उपलब्ध साठवणी प्रमाणे ठरवली जाईल.

**तक्ता क्रं. ११ (सर्व मीमी$^3$ मधे)**

| धरणाचे नाव | १५/१०/२०१५ ला असणारी चल साठवण | | | १५/२/२०१६ ला असणारी चल साठवण | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उत्प्लव शिर्षाचे खाली | उत्प्लव शिर्षाचे वर | एकुण | उत्प्लव शिर्षाचे खाली | उत्प्लव शिर्षाचे वर | एकुण |
| १ | २अ | २ब | २ | ३अ | ३ब | ३ |
| डिंभे | २१९.३० | ०.०० | २१९.३८ | ९४.६९ | ०.०० | ९४.६९ |
| वडज | १४.३७ | १८.८५ | ३३.२२ | १३.५८ | ०.०० | १३.५८ |
| माणिकडोह | ५६.७२ | ०.०० | ५६.७२ | ७.२८ | ०.०० | ७.२८ |
| पिंपळगाव जोगे | १६.७९ | २४.९३ | ४१.७२ | ९.६६ | ०.०० | ९.६६ |
| येडगाव | ८.४९ | ७०.७८ | ७९.२८ | ८.४९ | ५.७६ | १४.२५ |
| एकुण | ३१५.७५ | ११४.५७ | ४३०.३२ | १३३.७० | ५.७६ | १३९.४६ |

असे दिसुन येईल की, सध्या जे पाणी विल्प्लव शिर्षाच्या वर उपलब्ध आहे ते दि. १५/०२/२०१६ ला फक्त ५.७६ मीमी$^3$ आहे. घोड प्रकल्पाच्या रबीच्या एक आवर्तनाला ११५.४६ मीमी$^3$/४ = २८.८५६ मीमी$^3$ पाणी लागते. परंतु आता रबीच्या हंगाम त्याच्या शेवटाला आहे. जरी पाणी सोडण्याचे निर्देश दिले तर वहन आणि गळतीची हानी, सध्याचे जास्त उष्णतामान लक्षात घेता, बरीच होईल. या प्रकारे आता कुकडी संकुलातून पाणी या स्थितीत सोडल्यामुळे फायद्याचे ठरणार नाही. तथापि, भावी वर्षात पाणी वरच्या व खालच्या प्रवाहाच्या जलाशयांच्या पाणी साठवणीवर बरेच काही अवलंबुन राहील आणि जे शेवटी त्या वर्षाच्या पडणाऱ्या पावसावर अवलंबुन असेल. आम्ही म. कृ. खो. वि. महामंडळ, पूणे ला निर्देश देतो की, पुढच्या वर्षी गरज भासल्यास, किती पाणी वरच्या प्रवाहातुन सोडावे लागेल याची गणना करावी. ही गणना, यासाठी दिलेल्या

मार्गदर्शक तत्वांच्या आधारे करावी. त्याप्रमाणे म. कृ. खो. वि.महामंडळ, पूणे आपला अहवाल दरवर्षी दि. १५ ऑक्टोबर नंतर ताबडतोब आम्हाला सादर करतील, ज्याप्रमाणे आवश्यक आदेश देता येईल.

**५.निर्णय:—**

वर दिलेल्या पार्श्वभूमिनुसार, निर्देश देण्यात येतात की,

(अ) प्रत्येक वर्षी ऑक्टोबर महिन्याच्या शेवटी जेंव्हा खालच्या प्रवाहातील जलाशयात नियोजित वार्षिक पाणी वापरावयाचे प्रमाण, वापरण्यायोग्य पाणी साठवणीच्या (खरीप वापर धरुन) तुलनेत, ६०% पेक्षा कमी असेल, तेंव्हा पाण्याचे अंदाजित समन्यायी वितरण उपखोऱ्या मधे करावे. तथापि, जर खालच्या आणि वरच्या प्रवाहाच्या जलाशयांमधे वापरण्यायोग्य पाण्याच्या साठवणीमधे असणारी तफावत १५% पेक्षा कमी असेल, तर पुनर्वितरण करणे आवश्यक राहणार नाही.

(ब) कुकडी संकुलातुन घोड जलाशयात जे पाणी आतापर्यंत सोडले आहे त्या व्यतिरिक्त, यावेळी पाणी सोडणे व्यवहारिक नाही कारण दि. १५/०२/२०१६ पाणी सोडण्या इतपत कुकडी संकुलातील साठा केवळ ५.७६ मीमी$^{३}$ आहे, त्याशिवाय पाण्याच्या वहन काळात बरीच हानी होऊ शकते.

(क) राज्य शासनाने एक अभ्यास गट स्थापन करावा जो प्रत्येक उप खोऱ्यात पाण्याच्या समन्यायी वितरणासाठी मार्गदर्शक तत्वांची शिफारस करील

वर दिलेले निष्कर्ष आणि निर्देशानंतर, याचिका व अर्ज निकालात निघाले आहे.

स्वा.
(रवी बी बुधराजा)
अध्यक्ष

स्वा.
(चित्कला झुत्शी)
सदस्य (ईकानॉमी)

स्वा.
(डॉ. सुरेश कुळकर्णी)
सचिव